**संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ**
**(नॅकद्वारा 'अ' मानांकन प्राप्त)**

**जनसंपर्क विभाग**

---

## विद्यापीठात 'क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले अध्यासन केंद्र' सुरु करण्यासाठी दाननिधीदेण्याबाबत कुलगुरूंचे आवाहन
## व्यवस्थापन परिषदेचा निर्णय

अमरावती.

संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषदेने विद्यापीठात 'क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले अध्यासन केंद्र' सुरु करण्याकरीता समाजातील सामाजिक संघटना व दानशूर व्यक्तींकडून दाननिधी स्वीकारण्याचा निर्णय घेतला आहे. सदर निर्णयानुसार सामाजिक संघटना व दानशूर व्यक्तींना निधी देण्याकरीता आवाहन करण्यात यावे, असाही निर्णय त्यांनी घेतला असून विद्यापीठाचे कुलगुरूंनी सदर अध्यासन सुरु करण्यासाठी मोठ्या प्रमाणावर दाननिधी विद्यापीठाला द्यावा, असे आवाहन केले आहे.

स्त्री शिक्षणाच्या प्रणेत्या भारताच्या पहिली महिला शिक्षिका व मुख्याध्यापिका क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांनी शिक्षणाच्या माध्यमातून महिलांना एक नवी दिशा, नवसंजीवनी देण्याचे अखंडीत कार्य केले. मुलींसाठी पहिली शाळा त्यांनी सुरु केली आणि स्वतः शिक्षक म्हणून कार्य केले. एकोणविसाव्या शतकाच्या मध्यार्थात भारतासारख्या रुढीवादी परंपरा असणाऱ्या देशात स्त्रीला समाजात 'चूल आणि मूल' एवढेच स्थान होते. अशा काळात सर्व टीका, छळ सहन करुन समाज सुधारण्याचे काम महात्मा ज्योतिबा फुले व सावित्रीबाई फुले या दाम्पत्यांनी केले.

समाजाचा विकास शिक्षणातून होतो, याची जाणीव या दाम्पत्यांना होती. समाजाच्या सर्वांगीण विकासासाठी सर्वसामान्यांना विशेषतः स्त्रीयांना शिक्षण देण्याचे व्रत या दाम्पत्यांनी स्वीकारले, त्यासाठी त्यांना लोकांकडून प्रचंड मानापमान सहन करावा लागला, असे असले तरी या दाम्पत्यांनी समाज सुधारण्याचे आपले कार्य निरंतरपणे सुरु ठेवले. त्यामुळे स्त्रीला मानसन्मान मिळाला, पुरुषांच्या बरोबरीने अधिकार मिळालेत, याचा भारतीय म्हणून आम्हाला सार्थ अभिमान वाटतो.

क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांचे कार्य नवीन पिढीपर्यंत सातत्याने पोहोचावे, या उद्देशाने विद्यापीठात 'क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले अध्यासन केंद्र' स्थापन करण्याकरीता सामाजिक संघटना व दानशूर व्यक्तींकडून निधी उपलब्ध होणे आवश्यक आहे, त्यांच्या निधीतून हे अध्यासन केंद्र विद्यापीठात सुरु करता येवू शकते. या केंद्रामार्फत महात्मा फुले व सावित्रीबाई फुले यांच्या विचारकार्याचा व्याख्यानमाला व सेमिनारच्या माध्यमातून सर्वापर्यंत प्रसार, तसेच सत्यशोधक समाजाच्या साहित्यावर संशोधन, संशोधनकर्त्यांना स्कॉलरशीप, महात्मा फुले व सावित्रीबाईंच्या विचारांचा वारसा ज्यांनी पुढे नेला अशा विविध मान्यवरांच्या वैचारिक व संशोधनपर लेखांचे संकलन, संपादन व प्रकाशन, सत्यशोधक चळवळीच्या इतिहासाचे लेखन, संपादन, याशिवाय फुले दाम्पत्यांचे कला दालन आदी उपक्रम राबविले जावू शकतील.

'क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले अध्यासन केंद्र' सुरु करण्याकरीता समाजातील सामाजिक संघटना व दानशूर व्यक्तींनी मोठ्या प्रमाणावर दाननिधी देण्याचे आवाहन विद्यापीठाचे कुलगुरूंनी केले आहे. तरी सर्वांनी सकारात्मक प्रतिसाद या सामाजिक कार्यासाठी द्यावा व ज्यांना दाननिधी द्यावयाचा आहे, त्यांनी कुलसचिव डॉ. तुषार देशमुख यांचेशी संपर्क साधावा, अशी विनंती विद्यापीठाच्यावतीने करण्यात आली आहे.

---

प्रति, **जनसंपर्क विभाग**

मा. संपादक/जिल्हा प्रतिनिधी दि. १२/०७/२०१९.

दै.............................. अमरावती.

मा. महोदय,

आपणांस विनंती करण्यात येते की, सोबतच्या वृत्तास आपल्या लोकप्रिय वृत्तपत्रातून कृपया प्रसिद्धी द्यावी, ही विनंती.

आपला,

**(डॉ. विलास नांदुरकर)**
जनसंपर्क अधिकारी

C:Users/PRO/Desktop/University News 2019 193